


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २७१ •बुधवार, दि.३१ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# राज्यातील 3,798 शाळांचे 'जिओ टॅगिंग' अपूर्ण

## प्रक्रिया पूर्ण करण्याची 10 दिवसांची मुदत, शिक्षण आयुक्तांचा कडक पवित्रा...

**मुंबई । प्रतिनिधी**

''जिओ टॅगिंग' करण्याबाबत दिरंगाई होत असल्याने राज्यातील ३ हजार ७९८ शाळांचे अद्यापपर्यंत मॅपिंग झालेले नाही. याबाबत शिक्षण विभागाकडून वारंवार सूचना देऊनही विलंब होत असल्याने संबंधित शाळांना १० दिवसांमध्ये प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले.

**● मॅपिंग न झालेल्या शाळांची जिल्हानिहाय संख्या**

छत्रपती संभाजी नगरधील सर्वाधिक ४७७ शाळांचे मॅपिंग झाले नसून, त्याखालोखाल मुंबई उपनगर ४३७, नागपूर ४०३, यवतमाळ ३२६, नांदेड ३०२, कोल्हापूर २०२, नाशिक १७८, जालना १४२, धुळे १३२, सांगली १२७, सोलापूर १००, बीड ९४, पुणे ९०, जळगाव ५८, सातारा ५६, ठाणे ३४, लातूर २०, अमरावती १८, हिंगोली १६, सिंधुदुर्ग ११, अहिल्यानगर, गोंदिया व अकोला प्रत्येकी १०, परभणी, वाशिम व चंद्रपूर प्रत्येकी ८, वर्धा ७, रायगड ६, पालघर व रत्नागिरी प्रत्येकी ५, मुंबई शहर ४, बुलढाणा, धाराशीव, गडचिरोली, नंदूरबारमध्ये प्रत्येकी १, भंडारा ०.



राज्यातील शाळांना भौतिक सुविधांसह शाळेच्या ठिकाणाचे 'जिओ टॅगिंग' करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार राज्यातील जवळपास १ लाख ४ हजार ३६७ शाळांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले आहे. तर तब्बल ३ हजार ७९८ शाळांनी जिओ टॅगिंगसंदर्भात कोणतीही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही.

क्षेत्रीय कार्यालयांकडून याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही काही शाळांकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, त्यामुळे प्रशासनाकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. ज्या शाळांनी ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांनी पुढील १० दिवसांमध्ये ती पूर्ण करावी, असे निर्देश शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांसह विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी,

▶▶ उर्वरित पान २ वर

# अखेर संपूर्ण पिक्चर झालं क्लिअर...

## कोणत्या महापालिकेत कोणता पक्ष किती जागा लढवणार? A टू Z यादी आली समोर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची आज शेवटचा दिवस होता. सर्व पक्षांच्या अधिकृत उमेदवारांसह अपक्ष उमेदवारांनीही आज अर्ज दाखल केला. बऱ्याच पक्षांना बंडखोरीचाही सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी युती आणि आघाडी झाली आहे, तर काही ठिकाणी अनेक पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर आता कोणत्या महापालिकेत कोणता पक्ष किती जागा लढवणार हे समोर आले आहे. राज्यातील सध्याचे राजकीय




चित्र काय आहे? याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

▶ठाणे महापालिका (१३१ जागा)

शिवसेना – ८७

भाजप – ४०

▶▶ उर्वरित पान २ वर

# शिंदेंचे २ 'धुरंधर' भाजपला नडले, जागावाटपात अडून बसले

## ५२ जागांची ऑफर असताना ९० जागा मिळवल्या

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अर्ज दाखल करण्याची लगबग सुरु झाली होती. ती आज संपली. बऱ्याच ठिकाणी बंडखोरांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरले आहेत. त्यामुळे प्रमुख पक्षांची डोकेदुखी वाढली आहे. मुंबईत शिंदेसेना-भाजप विरुद्ध



ठाकरे बंधू असा थेट सामना होणार आहे. ठाकरे बंधूंची युती झाल्याचा फायदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उठवला आणि भाजप सोबतच्या चर्चेतून ९० जागा मिळवल्या. यात दोन नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. मुंबई महापालिका निवडणूक युती म्हणूनच लढणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीपासूनच सांगितलं होतं. पण

**● शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेच्या ४० हून अधिक नगरसेवकांनी ठाकरेंची साथ सोडली आणि शिंदे गटाची वाट धरली. अन्य पक्षातील २१ माजी नगरसेवकदेखील शिंदे यांनी गळाला लावले. त्यामुळे शिंदे यांच्याकडे ६० प्रभागांमधील माजी नगरसेवक होते. शिवसेनेनं गेल्या निवडणुकीत जिंकलेल्या ८४ जागांसाठी शिंदे प्रचंड आग्रही होते. अखेर ५२ वरुन सुरु झालेली चर्चा ९० वर जाऊन थांबली. जागावाटपात शिंदेसेनेनं मोठी मजल मारली.**

▶▶ उर्वरित पान २ वर

# सराईत गुन्हेगारांच्या दोन टोळ्या पकडण्यात एलसीबीला यश



**बीड । प्रतिनिधी**

वासनवाडी शिवारातून ल्युमिनियम तार चोरणारी सराईत गुन्हेगारांची टोळी पोलिसांनी पावर हाऊस माऊली नगर बीड येथून जेरबंद केली. तर वडवणी येथून कॉपर केबल, पाणबुडी व बोरच्या मोटारीसह शेळ्या चोरणारी दुसरी टोळी जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेने यश मिळवले.

बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बीड मधील माऊली नगर, पावर हाऊस जवळून भीमा लक्ष्मण मस्के व ३९ वर्ष, विजय वसंत तायड वय २५ वर्ष रा. माऊली नगर बीड तसेच हुसेन बशीर शेख वय ४५ वर्ष रा. पावर हाऊस जवळ माऊली नगर बीड या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला सापळा रचून पकडले. त्यांच्याकडून ५०० किलो एल्युमिनियम तार जप्त करण्यात आली. या टोळीने बीड ग्रामीण व माजलगाव ग्रामीण

▶▶ उर्वरित पान २ वर

# जेव्हा शरद पवारांनी गौतम अदानींबद्दल म्हटलं होतं...

## 'लोकलमध्ये वस्तू विकणाऱ्या तरुणाने उभारलं साम्राज्य'

**मुंबई । प्रतिनिधी**

'पवार साहेब आणि माझे ३० वर्षांपेक्षा जुने संबंध आहे. मी त्यांच्याकडून खूप शिकलो ते ज्ञानाच्याही पलीकडचं आहे. ते माझे मेंटॉर आहेत.'

'रात्रंदिवस काम करणारा आणि अतिशय साधा असणारा हा तरुण उद्योजक (गौतम अदानी) जमिनीवर पाय ठेवून आहे.'

दोन प्रसिद्ध व्यक्तींनी एकमेकांचं कौतुक करताना काढलेले हे उद्गार. या दोन व्यक्ती म्हणजे उद्योगपती गौतम अदानी आणि शरद पवार.

बारामतीमध्ये रविवारी (२८ डिसेंबर २०२५) शरदचंद्र पवार




सेंटर ऑफ एक्सलन्स इन AI चं उद्घाटन करण्यात आलं. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगपती गौतम अदानी आणि त्यांच्या पत्नी प्रिती अदानी हे होते. राज्य आणि केंद्रीय राजकारणातही कायम चर्चेत असणारं बारामती या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेत आल्याचं पाहायला मिळालं. कार्यक्रमाच्या निमित्ताने पवार कुटुंब एकत्र येणार हे या चर्चेचं कारण होतंच. पण गौतम अदानी आणि शरद पवार यांच्या भेटीगाठी आणि संबंध

▶▶ उर्वरित पान २ वर

# उद्योगपती अनंत अंबानी साई चरणी नतमस्तक

## तब्बल पाच कोटी रूपयांची दिली देणगी

**शिर्डी । प्रतिनिधी**

उद्योगपती अनंत अंबानी यांनी सोमवारी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं मनोभावे दर्शन घेतलं. यावेळी अंबानी यांनी साईबाबांच्या धूप आरतीला उपस्थिती लावली. साईबाबांच्या दर्शनानंतर अनंत अंबानी यांनी संस्थानला तब्बल पाच कोटी रूपयांची देणगी दिली.



पाच कोटी रुपये केले अर्पण – उद्योगपती मुकेश अंबानी यांचं संपूर्ण कुटुंब शिर्डी साईबाबांचं परमभक्त म्हणून ओळखलं जातं. अंबानी कुटुंबीयांची साईबाबांवर अतूट श्रद्धा आहे. मुकेश अंबानी यांच्या पत्नी नीता अंबानी आणि सुपुत्र आकाश अंबानी हे न चुकता वर्षातून दोन ते तीन वेळा शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं मनोभावे दर्शन घेत असतात. दरवेळी साईबाबांच्या समाधीवर निळ्या रंगाची चादर अर्पण करतात. उद्योगपती मुकेश अंबानी यांचे धाकटे

▶▶ उर्वरित पान २ वर

# 'गोदाकाठच्या वाघाने थंडीत उघड्यावर शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांकडे पाहावे!'

## पालकमंत्री अजितदादांचा ताफा अडवून काळे झेंडे दाखवण्याचा इशारा: डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवण केंद्रांतर्गत दत्तनगर वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांवर शिक्षणासाठी अक्षरशः उघड्यावर बसण्याची वेळ आली आहे. सुसज्ज शाळा इमारत असतानाही गेल्या दोन महिन्यांपासून शाळेकडे जाणारा रस्ता बंद झाल्याने विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली, थंडी-ऊन्ह-वारा सहन करत शिक्षण घ्यावे लागत आहे.

या गंभीर प्रकाराबाबत सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांनी दि. २२ नोव्हेंबर



रोजी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री अजितदादा पवार व आमदार विजयीळपह पंडित यांना लेखी निवेदन दिले होते. मात्र महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

दत्तनगर वस्ती शाळेत इयत्ता १ ते ४ चे

▶▶ उर्वरित पान २ वर









# नोकरीच्या शोधात तरुणाई : २०२६ मध्ये संघर्ष संपणार का?

भारत आणि जग सध्या परिवर्तनाच्या अत्यंत निर्णायक टप्प्यावर उभे आहेत. आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानाचा झपाट्याने वाढणारा प्रभाव आणि जागतिक स्पर्धा यामुळे सुशिक्षित तरुणांसमोर रोजगाराच्या संधींबाबत मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेक युवक–युवतींच्या मनात हा प्रश्न सतत घोळत आहे की २०२६ हे वर्ष त्यांच्या दीर्घ संघर्षाचा शेवट ठरेल का, की अजून काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

जागतिक पातळीवर पाहता, आंतरराष्ट्रीय मजूर संस्थेच्या अहवालानुसार २०२३ मध्ये जागतिक युवक बेरोजगारीचा दर सुमारे १३ टक्के होता आणि तरुणांसाठी रोजगार मिळवणे आजही प्रौढांपेक्षा अधिक कठीण आहे. ही परिस्थिती भारतालाही तितकीच लागू होते. तथापि, भारताच्या संदर्भात काही आशादायी संकेत स्पष्टपणे दिसत आहेत. खपवळर डज्ञळश्रश्री ठर्शोीं २०२६ नुसार भारतातील रोजगारयोग्यता ५६.३५ टक्क्यांपर्यंत वाढली असून प्रथमच महिलांची रोजगारतयारी पुरुषांपेक्षा अधिक असल्याचे नोंदले गेले आहे. हा बदल भारतीय तरुणाईच्या कौशल्यांमध्ये होत असलेल्या सकारात्मक परिवर्तनाचा ठोस पुरावा आहे.

याच वेळी जागतिक पातळीवरही रोजगाराबाबत काही प्रमाणात स्थैर्य निर्माण होत असून आंतरराष्ट्रीय मजूर संस्थेच्या अंदाजानुसार २०२५ आणि २०२६ या काळात जागतिक बेरोजगारीचा दर सुमारे ५ टक्क्यांच्या आसपास राहण्याची शक्यता आहे, जी ऐतिहासिकदृष्ट्या कमी मानली जाते. २०२६ पर्यंत ज्या क्षेत्रांत सर्वाधिक संधी निर्माण होणार आहेत त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, क्लाउड कम्प्युटिंग, डिजिटल मार्केटिंग, ग्रीन एनर्जी, ईव्ही उद्योग, सेमीकंडक्टर, हेल्थ टेक आणि ॲग्री–टेक यांचा समावेश आहे. या सर्व क्षेत्रांत प्रशिक्षित तरुणांसाठी २०२६ हे वर्ष अत्यंत निर्णायक ठरणार आहे.

सरकारकडूनही या बदलाला पाठबळ देण्यासाठी आयटीआय आधुनिकीकरण, कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योग–शिक्षण भागीदारीवर विशेष भर दिला जात आहे, ज्यामुळे तरुणाईला उद्योगाच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये मिळू शकतील. तरीही हे लक्षात घेणे आवश्यक आहे की संघर्ष पूर्णपणे आपोआप संपणार नाही. पदवीपेक्षा कौशल्य, डिजिटल साक्षरता, व्यावसायिक प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष उद्योगातील अनुभव यांना अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. त्यामुळे २०२६ मध्ये संधी निश्चितच वाढणार असल्या, तरी त्या संधी मिळवण्यासाठी तरुणाईने स्वतःला बदलत्या बाजारपेठेशी जुळवून घ्यावेच लागेल.

म्हणूनच २०२६ हे वर्ष भारतीय सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी पूर्णतः संघर्षमुक्त नसेल; पण ते संघर्षाला ठोस दिशा देणारे, आशेची नवी वाट उघडणारे आणि रोजगाराच्या संधी वाढवणारे वर्ष ठरण्याची सर्व चिन्हे दिसत आहेत. योग्य कौशल्य, योग्य मार्गदर्शन आणि सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारणाऱ्या तरुणांसाठी २०२६ हे स्थैर्य, आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेची सुरुवात ठरू शकते – आणि हाच या पिढीसाठी सर्वात मोठा आशेचा संदेश आहे.

**– डॉ. भारत कऱ्हाड,**
**दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

◆ पान १ वरून पुढे...

## राज्यातील 3,798...

गटशिक्षणाधिकारी यांना परिपत्रकाद्वारे या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधितांनी शाळांचे मॅपिंग का करण्यात आले नाही, शाळा बंद असतील तर संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी पडताळणी करून याबाबतची माहिती 'युडायस'मध्ये अद्ययावत करावी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. मॅपिंग न केलेल्या शाळांचा अहवाल सर्व शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांना सादर करावा. त्यानंतर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी शिक्षण आयुक्तालयास एकत्रित अहवाल सादर करावा, असे निर्देशही शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले. शाळांचे भौतिक ठिकाण छायाचित्रासह 'टॅग' करून सर्व सुविधांची माहिती एकत्रित करण्यासाठी महाराष्ट्र रिमोट सेन्सिग ॲप्लिकेशन सेंटर या संस्थेद्वारे 'महास्कूल जीआयएस मोबाइल प्लिकेशन' विकसित करण्यात आले आहे. त्यात 'जिओ टॅगिंग'ची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबतच्या सूचना राज्यातील शाळांना एप्रिलमध्ये देण्यात आल्या होत्या. त्यानुसार राज्यातील १ लाख ४ हजार ३६७ शाळांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले असून ३ हजार ७९८ शाळांचे जिओ टॅगिंग अद्यापही शिल्लक आहे. आता उर्वरित शाळांना येत्या दहा दिवसांत याबाबतची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.मुंबईतील ४४१ शाळांचे मॅपिंग अपूर्ण–मुंबई शहर व उपनगर या दोन जिल्ह्यांमध्ये ४ हजार ८५ इतक्या शाळा आहेत. यामध्ये मुंबई शहरमध्ये १ हजार ७४२ शाळा असून, त्यातील १ हजार ७३८ शाळांचे मॅपिंग झाले असून, अवघ्या ४ चार शाळांचे मॅपिंग शिल्लक आहे. तसेच उपनगरमध्ये २ हजार ३४३ शाळांपैकी १ हजार ९०६ शाळांचे मॅपिंग झाले आहे. तर ४३७ शाळांचे मॅपिंग शिल्लक आहे.

## अखेर संपूर्ण...

राष्ट्रवादी – ७५ ( स्वबळावर )
काँग्रेस – १०० ( स्वबळावर )
मनसे – ३४
शिवसेना (ठाकरे)– ५३
राष्ट्रवादी (शरद पवार) – ३६
▶ नागपूर महानगरपालिका (१५१ जागा)
भाजप – १४३
शिवसेना – ८
राष्ट्रवादी – ९४
काँग्रेस – १५१
शिवसेना (ठाकरे) – १० (आकडा अध्याप अपूर्ण )
राष्ट्रवादी (शरद पवार ) – ६४
मनसे – १५
MIM – ३ जागा (आकडा अद्याप अपूर्ण)
बसपा – ८ (आकडा अद्याप अपूर्ण)
वंचित – ७५ जागा
▶ चंद्रपूर महापालिका (६६ जागा)
भाजप – ५८
शिवसेना – ०८
राष्ट्रवादी – ४० (स्वबळावर )
काँग्रेस – ६३
जनविकास सेना – ३
मनसे – २५ (स्वबळावर)
शिवसेना (ठाकरे) आणि वंचित – प्रत्येकी ३३
राष्ट्रवादी (शरद पवार) – ५५
▶ पिंपरी चिंचवड महापालिका (१२८ जागा)
भाजप + आरपीआय आठवले गट युती
भाजप – १२३
आरपीआय – ०५
दोन्ही राष्ट्रवादी आघाडी
अजित पवार – ११०
शरद पवार – १८ (दोन प्रभागात मैत्रीपूर्ण लढत )
शिवसेना स्वबळावर – काही जागा लढणार
शिवसेना (ठाकरे)–मनसे–रासप युती
शिवसेना (ठाकरे) – ६३
रासप – ०३
मनसे – १९
काँग्रेस – ६० (स्वबळावर लढण्याची शक्यता)
आम आदमी पार्टी – (४० जागा स्वबळावर लढण्याची शक्यता)
वंचित बहुजन आघाडी – काही जागा स्वबळावर लढणार
▶ छत्रपती संभाजीनगर (११५ जागा)
भाजपा – ९५
शिवसेना – ८७
उबाठा – ८९
राष्ट्रवादी – ८२
वंचित – ७०
राष्ट्रवादी (शरद पवार) – २२
▶ लातूर महानगरपालिका (७० जागा)
भाजपा – ७०
काँग्रेस – ६५
वंचित – ०५
राष्ट्रवादी – ६०
शिवसेना – ११
राष्ट्रवादी ( शरद पवार) – १७
शिवसेना (ठाकरे) – ०९
▶ जालना महानगर पालिका (६५ जागा)
भाजप – ६४, RPI १ जागा
शिवसेना – ६५ जागा
राष्ट्रवादी–वंचित –मनसे युती – राष्ट्रवादी – ५० जागा,
मनसे – ६ जागा
महाविकास आघाडी
काँग्रेस – ४०
राष्ट्रवादी (शरद पवार) – १३
शिवसेना (ठाकरे) – १२
▶ मालेगाव महापालिका ( ८४ जागा)
शिवसेना – २४
भाजप – २०
MIM – ५७
ISMAL पार्टी ४५ आणि समाजवादी १८ = ६३(एकत्रित)
शिवसेना (ठाकरे) – १२
काँग्रेस – २२
राष्ट्रवादी – १०

## शिंदेंचे २...

जागावाटपाच्या पहिल्या फेरीत भाजपनं शिंदेसेनेला केवळ ५२ जागांचा प्रस्ताव दिला. शिंदेसेना १२५ जागांसाठी आग्रही असताना त्याच्या निम्म्या जागाही भाजपनं देऊ केल्या नाहीत. गेल्या निवडणुकीत शिवसेनेचे ८४ उमेदवार निवडून आले होते. पण तरीही भाजपनं ५२ जागांचा प्रस्ताव दिला. जागावाटपाच्या चर्चेत पहिल्याच फेरीत भाजपनं शिंदेसेनेला केवळ ५२ जागांचा प्रस्ताव दिला. शिंदेसेनेला बॅकफूटवर ढकलण्याचा प्रस्ताव भाजपनं करुन पाहिला. पण शिंदे यांनी त्यांचे दोन मातब्बर नेते चर्चेसाठी पाठवले आणि हळूहळू चित्र बदलले. मंत्री उदय सामंत आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांनी चर्चेत शिंदेसेनेची भूमिका अगदी ठासून मांडली. राहुल शेवाळे दोन टर्मचे खासदार आहेत. मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी प्रदिर्घ काळ काम केलं आहे. त्यामुळे शहराची, पालिका प्रभागांची त्यांना चांगली जाण आहे. याचा फायदा शिंदेसेनेला झाला. उदय सामंत आणि राहुल शेवाळे वाटाघाटीत कमी पडले नाहीत. त्यामुळेच ५२ जागांवरुन सुरु झालेली चर्चा ९० च्या घरात पोहोचली.

## सराईत गुन्हेगारांच्या...

परिसरात गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. ही कारवाई २७ डिसेंबर रोजी करण्यात आली.
त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वडवणी येथून वीरसिंग शेरसिंग गोके वय २४ वर्ष रा. पोलीस कॉलनी शेजारी अंबाजोगाई, मोहनसिंग मोहब्बतसिंग टाक वय २१ वर्ष रा. बस स्थानक मागे वडवणी याबरोबरच जिगरसिंग मोहब्बतसिंग टाक वय १९ वर्ष रा. बस स्थानक मागे वडवणी यांना पकडण्यात यश मिळवले. त्यांनी केलेल्या चार घरपोडीच्या व चोरीच्या दोन गुन्ह्यांची कबुली दिली. या तीन जणांच्या टोळीने नेकनूर अंबाजोगाई ग्रामीण व शहर तसेच धारूर सह परळी संभाजीनगर ठाणे परिसरात गुन्हे केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. पकडलेल्या या आरोपीकडून ल्युमिनियम तार, पाणबुडी मोटारी, कॉपर केबल तीन बंडल सहा बोरच्या मोटारी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही टोळ्यांकडून पोलिसांनी तीन लाख २१ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले.
ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, रामचंद्र केकान ,मारुती कांबळे ,सोमनाथ गायकवाड, विष्णू सानप, गोविंद भताने, सचिन आंधळे, विकी सुरवसे, अतुल हराळ यांनी पार पाडली

## जेव्हा शरद...

यावरही या निमित्ताने पुन्हा चर्चा सुरू झाली.
माध्यमांनी हा कार्यक्रम आणि अदानी–पवार भेटीचं त्यांच्या पद्धतीनं विश्लेषण केलंच. पण तेवढंच नाही तर, प्रामुख्यानं सोशल मीडियावरही या मुद्द्यावरून लोकांनी अगदी परखडपणे त्यांची मतं मांडली. सध्या देशाच्या आणि राज्याच्या राजकारणातही शरद पवार हे विरोधकांच्या भूमिकेतून सरकारवर टीका करताना दिसतात.
पण, राहुल गांधींसह विरोधकांचा एक मोठा गट अदानी आणि सरकारच्या संबंधांवर प्रश्न उपस्थित करत असताना शरद पवार मात्र कशाचीही पर्वा न करता अगदी उघडपणे गौतम अदानींबरोबर घनिष्ठ संबंध असल्याचं अगदी अभिमानानं सांगतात. त्यांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमात अदानींची उपस्थिती असते.
एवढंच काय तर प्रचंड चर्चा झालेल्या 'हिंडनबर्ग' प्रकरणावेळीही विरोधक आक्रमकपणे टीका करत असताना शरद पवारांनी मात्र या प्रकरणी वेगळीच भूमिका मांडत या प्रकरणातील हवा काढून घेतल्याचं त्यावेळी विश्लेषकांनी म्हटलं होतं. या निमित्ताने शरद पवार आणि गौतम अदानींचे संबंध कसे राहिले आहेत आणि ते कशाप्रकारे समोर आले आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.
पण तत्पूर्वी रविवारच्या कार्यक्रमात अदानी आणि पवारांनी उधळलेली एकमेकांबाबतची स्तुतीसुमनं कशी होती? ते पाहूयात.
'पवार साहेब माझे मेंटॉर'–या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने बारामतीमध्ये पवार कुटुंबही एकत्र जमल्याचं पाहायला मिळालं. संपूर्ण पवार कुटुंबानं गौतम अदानींच्या कुटुंबाचं मोठ्या उत्साहानं स्वागत केलं. दोन्ही कुटुंबांमध्ये असलेला जिव्हाळा दाखवण्याचा पुरेपूर प्रयत्न त्यातून दिसून आला. या कार्यकमात बोलतानाही शरद पवारांनी गौतम अदानींचं तोंडभरून कौतुक केलं. गौतमभाई असा उल्लेख करत गौतम अदानींनी अगदी शून्यातून सुरुवात करत आज हे यश मिळवलं असल्याचं शरद पवारांनी यावेळी बोलताना सांगितलं. तर अदानींनीही भाषणात सुरुवातीला पवारांची स्तुती केली. पवार कुटुंबाबरोबर आपले संबंध ३० वर्षांपेक्षा जुने असल्याचं गौतम अदानी म्हणाले.मी त्यांच्याकडून खूप काही शिकलो आहे आणि ते ज्ञानापेक्षाही पलीकडचं असून ते माझे मेंटॉर आहेत, असं म्हणत गौतम अदानींनी पवारांबाबतच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी बोलताना आपण बारामतीला अनेकवेळा (डझन्स ऑफ टाईम्स असं अदानी भाषणात म्हणाले) भेट दिली असल्याचं गौतम अदानींनी सांगितलं. पवार साहेबांनी बारामतीमध्ये जे काही केलं ते विकासापेक्षाही खूप मोठं आहे. संपूर्ण भारतानं आदर्श घ्यावा, अशी ही ब्लूप्रिंट पवार साहेबांनी तयार केली आहे, असही अदानी म्हणाले. पवारांच्या कामाच्या पद्धतीचं कौतुक करताना, पवार साहेबांना ग्राऊंड रिॲलिटी आणि नॅशनल अजेंडा यात समन्वय कसा साधायचा हे माहिती असल्याचंही गौतम अदानी म्हणाले.

## उद्योगपती अनंत...

सुपुत्र अनंत अंबानी हे देखील शिर्डी साईबाबांचे मोठे भक्त असून, २५ ऑक्टोबर २०२२ ला अनंत अंबानी यांनी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं होतं. तसंच त्यावेळी साईबाबांच्या चरणी तब्बल दीड कोटी रुपयांची देणगी अर्पण केली होती. सोमवारी देखील अनंत अंबानी यांनी साईबाबांच्या चरणी तब्बल पाच कोटी रुपयांची देणगी अर्पण केलीय. अनंत अंबानी यांचा संस्थाननं केला सत्कार – अनंत अंबानी यांनी सोमवारी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं. यावेळी साईबाबांच्या संध्याकाळच्या धूप आरतीला उपस्थितीही लावली. साईबाबांच्या दर्शनानंतर अंबानींनी साई समाधीवर निळ्या रंगाची शाल अर्पण केली. दर्शनानंतर साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी अनंत अंबानी यांचा साई शाल व साईबाबांची मूर्ती देऊन सत्कार केला. यावेळी साईबाबा संस्थानचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## 'गोदाकाठच्या वाघाने...

३५ विद्यार्थी शिक्षण घेत असून २ ते ३ शिक्षक कार्यरत आहेत. २००७–०८ मध्ये शासनाने तीन वर्गखोल्यांची इमारत बांधली आहे. मात्र परिसरातील वाढलेल्या बांधकामामुळे मागील दोन महिन्यांपासून शाळेचा रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. परिणामी विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छतागृह, निवारा अशा मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.
अंगणवाडीही बंद – बालक व गरोदर मातांचे हाल –शाळेजवळील अंगणवाडीत ६४ बालके व ५ गरोदर मातांची नोंद असून रस्ता बंद असल्यामुळे अंगणवाडीही बंद आहे. लसीकरण व पूरक आहारासाठी लाभार्थ्यांना दूर पायपीट करावी लागत असून याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे.
आंदोलनाचा इशारा– प्रशासनाने वारंवार निवेदन देऊनही दखल न घेतल्याने अखेर दि. ३१ डिसेंबर रोजी बीड येथील सहकार संकुल भवनाच्या भूमिपूजनासाठी येणाऱ्या उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवून निदर्शने करण्याचा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी त्यांनी गोदाकाठचा वाघ अशी उपाधी घेतलेल्या आ. विजयीळपह पंडित यांनी त्यांच्या गेवराई मतदारसंघातील शालेय मुलांचा रस्त्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## टोल नाक्यावर...

मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. जखमी बांगर कुटुंबीयांनी हल्लेखोरावर कडक कारवाईची मागणी केली आहे.आरोपींना अटक केली नाही तर टोल नाक्यावर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असून टोलनाका देखील बंद करण्यात येणार असल्याचा इशारा बांगर कुटुंबियांनी दिला आहे.

## अध्यात्मिक व धार्मिक...

एम.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. पाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले. काही काळ वैराग्यमूर्ती ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे यांच्या संस्थेत सेवा केल्यानंतर अध्यात्मिक साधनेला पूर्णतः वाहून घेतले. ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तारखेच्या तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण ज्ञान आत्मसात केले. कोणताही ज्योतिषशास्त्राचा औपचारिक अभ्यास न करता केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तीची जन्मतारीख, वार तसेच जीवनातील संभाव्य घटना अचूकपणे सांगण्याची अद्भुत क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे.त्यांच्या अनेक भाकितांचा अनुभव आजवर खरा ठरलेला असून राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक राजकीय व सामाजिक अंदाज चर्चेचा विषय ठरले आहेत. विशेष म्हणजे, नैराश्यात सापडलेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्यातील येणाऱ्या सकारात्मक क्षणांची जाणीव करून देत आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांपासून परावृत्त करण्याचे समाजकार्य महाराज सातत्याने करत आहेत. तसेच सामाजिक, अध्यात्मिक व पर्यावरण विषयक जनजागृतीचे कार्य अहोरात्र सुरू आहे. यापूर्वी त्यांना समाजरत्न पुरस्कार (१४ नोव्हेंबर २०२५) प्रदान करण्यात आला असून, आता गंगाई–बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ जाहीर झाल्याने त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव झाला आहे.या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बीड नगर...

अभिसरण आणि विकासाचे समीकरण साधणारे प्रतिनिधी मंडळ आम्ही लोकांच्या सेवेत देणार आहोत असे आ. विजयसिंह पंडित यांनी सांगितले असून यावेळी त्यांनी फारुक पटेल यांचा सत्कार केला व उपस्थित विजयी नगरसेवक व पक्ष पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.
बीड नगर पालिकेच्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आकडे जुळवताना आज आघाडी स्थापन करून गटनेता निवडला. ज्येष्ठ नगरसेवक राहिलेले फारुक पटेल यांची निवड करण्यात आली. सदरील निवड प्रक्रिया ही आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वात तथा पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, निवडणुक निरीक्षक मा. आ. संजय दौंड तथा पक्षाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शिवछत्र येथे पार पडली. सकाळी ११ वाजता सर्व नगरसेवकांच्या भावना, सूचना आ. विजयसिंह पंडित यांनी लक्षात घेऊन पक्षाकडे या संदर्भाने माहिती दिली आणि पक्ष सूचनेप्रमाणे आणि बीड शहरातील सामाजिक, राजकीय अभिसरण लक्षात घेता फारुक पटेल यांची निवड केल्याचे त्यांनी घोषित केले. त्यानंतर गटनेते व नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रशासकीय कार्यवाही पूर्ण केली.

## बुलढाणा अर्बन...

कामकाजावरही ताण निर्माण झाला. दरम्यान, या संदर्भात बँक प्रशासनाकडून स्पष्टीकरण देण्यात आले असून बुलढाणा अर्बन बँक बंद पडणार असल्याची कोणतीही अधिकृत माहिती नाही, ही केवळ अफवा असल्याचे सांगण्यात आले. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवरच अवलंबून राहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी मात्र अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाईची मागणी केली असून अशा खोट्या बातम्यांमुळे सर्वसामान्य खातेदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते, असे मत व्यक्त केले आहे. अफवांमुळे निर्माण झालेली ही परिस्थिती पाहता प्रशासन व बँक यंत्रणांनी नागरिकांना योग्य व वेळेवर माहिती देणे गरजेचे असल्याचेही बोलले जात आहे.

## श्री महाविष्णु मंदिर,...

करण्यासाठी मागील १ वर्षापासुन सतत पाठपुरावा करून राज्य शासनाची मंजुरी घेतलेली आहे. याबाबत शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या दि. २९ डिसेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिसूचना जारी करण्यात आली आहे. अधिसूचना अंतिम झाल्यानंतर या मंदिराच्या जतन व संवर्धन कामासाठी सांस्कृतिक विभागा मार्फत कोट्यावधी रूपयांचा निधी प्राप्त होणार असल्याची माहिती आ. प्रकाशदादा सोळंके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## सावित्रीबाई फुले...

चळवळ सुरू केली. शिक्षणासोबतच समाजातील अनिष्ट रूढी–परंपरांना सावित्रीबाई फुले यांनी कडाडून विरोध केला. त्या केवळ शिक्षिका नव्हत्या, तर महिला वर्गाच्या पहिल्या प्रभावी पुढारी होत्या. १८५४ साली प्रकाशित झालेल्या काव्यफुले या ग्रंथामुळे त्या देशातील पहिल्या आद्य कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. कवितेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन आणि शिक्षणाचे महत्त्व त्यांनी प्रभावीपणे समाजासमोर मांडले, असे प्रतिपादन डॉ.गवळी यांनी केले. स्त्री म्हणून जगणाऱ्या प्रत्येकाने सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष कधीही विसरू नये. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा ध्यास त्यांनी आयुष्यभर सोडला नाही. महात्मा फुले यांच्या निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक चळवळ पुढे नेत समाजजागृतीचे कार्य अखंड सुरू ठेवले. सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष आजही समाजाला प्रेरणा देणारा आहे, असे मत डॉ.गवळी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती अलका ताई शिंदे (राऊत) होत्या. प्रमुख उपस्थितीत बीड विधानसभेचे युवा नेते मा. डॉ. योगेश भैय्या क्षिरसागर, राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष तथा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस मा. सुभाष राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष तसेच सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा. कल्याण आखाडे, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष मा. किशोर राऊत, नगरसेवक मा. शुभम धुत, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष मा. नितीन साखरे आदी मान्यवर उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कौशल्या राऊत यांनी केले. प्रास्ताविक श्रीमती प्रियांका जाधव (गोरे) यांनी मांडले. मान्यवरांचे स्वागत श्रीमती साधना भोपळे, श्रीमती डॉ. वैशाली साळुंके, श्रीमती नंदा साळुंके व श्रीमती पूजा लांडगे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची प्रेरणा समाजात अधिक दृढ करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती तसेच परिसरातील फुले–शाहू–आंबेडकर विचारधारेवर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेनेच्या संजय...

जनतेशी असलेला थेट संपर्क आणि पक्षसंघटनातील योगदान लक्षात घेता संजय उडाण हे उपनगराध्यक्ष पदासाठी योग्य उमेदवार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, बीड नगरपालिका निवडणुकीतील विजयामध्ये यथायोग्य योगदान देणाऱ्या मित्र पक्ष शिवसेनेला न्याय मिळावा, या उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेसने शिवसेनेचे नगरसेवक संजय उडाण यांची उपनगराध्यक्ष पदी निवड करावी, अशी अधिकृत मागणी शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले आणि शिवसेना बीड जिल्हा संघटक सुनिल सुरवसे यांनी केली आहे. युतीतील घटक पक्षांमध्ये समन्वय राखून योग्य निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत असून उपनगराध्यक्ष पदाबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## रणवीर पंडित...

करण्यात आलेले आहे. मंगळवार दिनांक ३० डिसेंबर रोजी मालेगाव येथील शिवाजी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य मैदानावर व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, पत्रकार गणेश सावंत, जालिंदर धांडे जयभवानीचे माजी संचालकअप्पासाहेब खराद, माजी पंचायत समिती सदस्य शिवाजीराव गंगाधर, बळीरामजी खराद, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक नंदकिशोर गोरडे, बाजार समितीचे संचालक बाबासाहेब जाधव, चेअरमन पवन चव्हाण, अंगदराव खरात, सरपंच बबनराव बोरकर, विश्वनाथ सोनवणे, विलास वाघमोडे, संदीप मडके, परिक्षीत जाधव, देविदास खरात, अशोक बोरकर, कल्याणराव खरात, शिवाजीराव खरात यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. सार्थक लेंडगुळे या विद्यार्थ्याने खेळाडूंना शपथ दिली.त्यानंतर मुले आणि मुलाच्या गटांमध्ये होणाऱ्या होणाऱ्या या व्हॉलीबॉल स्पर्धेचा शुभारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला, दोन मैदानावर होणा–या या व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये संस्थेचे १८ शाळेचे संघ सहभागी झालेले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संभाजी सोनवणे यांनी केले. शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक सदाशिव गंगाधर यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेतील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना दिशा देणारे व्यासपीठ : गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे

## विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूल केज येथे 'वैभव' विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न



**केज । प्रतिनिधी**

केज येथिल विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूलमध्ये रविवारी वैभव विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रदर्शनाचा शुभारंभ केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे व संस्थेचे उपाध्यक्ष विजयकांत मुंडे यांच्या शुभहस्ते तर छत्रपती संभाजीनगर येथिल सरस्वती भवन महाविद्यालयाचे प्रा.विकास मिरगणे, विठाई हॉस्पिटलचे डॉ.ब्रह्ममहादेव डोईफोडे,संस्थेचे सचिव अतुल मुंडे,प्रा.माधुरीताई मुंडे, शाळेचे प्रिन्सिंपल अभिलाष चंद्रन यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.या प्रदर्शनात इयत्ता १ ली ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा, टाकाऊतून टिकाऊ वस्तू,जलसंधारण, प्रदूषण नियंत्रण, आधुनिक शेती, मा.पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे जीवन चरित्र तसेयांसारख्या विविध विषयांवर आधारित २०० हून अधिक प्रकल्प सादर केले होते.विशेषतः- विद्यार्थ्यांनी संत तुकाराम महाराज जीवनचरित्र देखाव्यानी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांनी पालकांना व पाहुण्यांना आपल्या प्रयोगांची माहिती अत्यंत आत्मविश्वासाने दिली.जगभरात नावाजलेल्या शास्त्रज्ञामध्ये आज भारतीयांचा मोठा सहभाग आहे. त्यामुळेच विज्ञान आणि भारत हे समीकरण झाले आहे. विज्ञानात भारतीयांचे योगदान मोलाचे आहे. भारतीय वैज्ञानिकांचे विद्यार्थ्यांनी अनुकरण करावे. विज्ञान आणि संशोधनात विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे सदस्य तथा संस्थेचे उपाध्यक्ष विजयकांत मुंडे यांनी केले.प्रसंगी जिनत शेख मॅडम,भायजु प्रकाश सर,आसराबाई अंकुरवाड मॅडम, धनंजय मस्के सर, अमर शिंदे सर,अविनाश शीलवंत सर,ओम ठोंबरे सर, नवीन कुमार सर, सोमनाथ इंगळे सर, रवी त्रिभुवन सर, राधा बन्साळी मॅडम, शुभांगी सगरे मॅडम, सुमया आतार मॅडम, शीला घोळवे मॅडम, तेजश्री सगरे मॅडम ,दिपाली राजमाने मॅडम, लीना त्रिभुवन मॅडम, अश्विनी मगर मॅडम, अंजुम शेख मॅडम, प्रणिता वाघमारे मॅडम, वैष्णवी वडगावकर मॅडम,आश्विनी सुरवसे मॅडम, सविता ओव्हाळ मॅडम, मेघा मोरे मॅडम, पल्लवी कुलकर्णी मॅडम ,शितल काळे मॅडम, पल्लवी गायकवाड मॅडम तसेच शिक्षेत्तर कर्मचारी गणेश काळे सर, शरद चवरे सर, आदिती पाटील मॅडम, अनिकेत पाटील सर तसेच सर्व मावशी व चालक यांचा प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी मोलाचा सहभाग होता.

**● छोट्या छोट्या प्रयत्नातून मोठे संशोधन जन्म घेते, अनेक संशोधकांनी आपल्या बालवयात विज्ञानाची आवड जोपासलयाने जगाला विज्ञानाचे चमत्कार पाहायला मिळाले.अशीच संशोधक वृत्ती विद्यार्थ्यांत रुजवण्यासाठी विज्ञान प्रदर्शन महत्त्वाचे ठरते असे प्रतिपादन केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी केले आहे.**

# बुद्धिबळ स्पर्धेत प्राथमिक गटातून अथर्व शिंदे तर माध्यमिक गटातून सिद्धांत निकम प्रथम

### शारदा क्रीडा महोत्सवात बुद्धीबळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**गेवराई । प्रतिनिधी**

शारदा क्रीडा महोत्सवात आयोजित केलेल्या बुद्धीबळ स्पर्धे ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत प्राथमिक गटातून शारदा विद्या मंदिरच्या अथर्व शिंदे याने तर माध्यमिक गटातून विशारदा पब्लिक स्कूलच्या सिद्धांत निकमने प्रथम क्रमांक पटकावलाअसून सर्व विजेत्यांचे शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी अभिनंदन केले आहे. क्रीडा महोत्सवात आयोजित केलेल्या बुद्धीबळ स्पर्धे त जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील १८ शाळेचे प्रत्येकी दोन स्पर्धक सहभागी झाले होते होते. अंतिम स्पर्धेत प्राथमिक गटातून शारदा विद्या मंदिर गेवराईच्या शिंदे अथर्व याने प्रथम तसेच शारदा विद्या मंदिरच्याच कु. लाड ज्ञानेश्वरी हिने द्वितीय तर माध्यमिक विद्यालय सिरसदेवीच्या कादे जगननीवास याने तृतीय क्रमांक पटकावला. माध्यमिक गटात शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगरच्या निकम सिद्धांत याने प्रथम व शारदा विद्या मंदिर गेवराईच्या खकाळ यश याने द्वितीय तर शारदा विद्या मंदिर गेवराईच्या कु. वेताळ सई हीने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेत आर्बिटर म्हणून शेंडगे आर. एस. आणि क्षिरसागर डी.के. यांनी काम पाहिले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी अभिनंदन केले असून लवकरच एका कार्यक्रमात सर्व विजेत्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी क्रीडा शिक्षकांसह, मुख्याध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर व गृहराज्यमंत्री तथा गृहनिर्माणमंत्री डॉ पंकज भोयर यांच्या हस्ते प्रकाशन



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद असून गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजातील विविध घटकांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत आहेत या संघाचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे इतर पत्रकार संघानी दखल घेऊन समाजासाठी काम करावे असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वे कर साहेब व गृहराज्यमंत्री तथा गृहनिर्माणमंत्री डॉ पंकज भोयर साहेब यांनी केले.यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे मुंबई येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात व मंत्रालयात सोमवार दि २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी प्रकाशन करण्यात आले. आष्टी तालुका युवा पत्रकार संघ विविध उपक्रम राबवत असून तसेच गेल्या १३ वर्षांपासून दिनदर्शिका प्रकाशित करून सर्वसामान्यांना व इतर सर्व क्षेत्रातील नागरिकांना मोफत वितरण करण्यात येत आहे. सन २०२६ च्या दिनदर्शिकेचे मुंबई येथील महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर साहेब यांच्या मुंबई येथील त्यांच्या मनोरा संपर्क कार्यालयात त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले तसेच गृहराज्यमंत्री तथा गृहनिर्माणमंत्री डॉ पंकज भोयर साहेब यांच्या मंत्रालयातील त्यांच्या दालनात त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तर या दोन्ही हि मान्यवरांनी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या कार्याचे कौतुक केले यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सचिव गहिनीनाथ पाचबैल, पत्रकार प्रेम पवळ, मारूती सत्रे, सोपान पगारे,बाळु राऊत, महेश गोरे आदी उपस्थित होते.

आजपर्यंत युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे या मान्यवरांच्या हस्ते झाले प्रकाशन.- आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे मागिल १३ वर्षापासून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक धार्मिक

# आष्टी पोलिस ठाणे हद्दीत अवैध धंद्याचा सुळसुळाट, अनेकांचे संसार उद्धवस्त होण्याच्या मार्गावर ; खाकी वर्दीचा धाक दिसेना





**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहर व परिसरातील नागरिक छोट्या-मोठ्या व्यवसायासह शेती करून उदरनिर्वाह करीत आहेत. आष्टी पोलीस ठाण्यातील खाकी वर्दीचा धाक न राहिल्याने अवैध दारू गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखू राजरोसपणे मिळत आहे. .रासायनिक प्रक्रिया केलेल्या पदार्थाची चटक निर्माण झाल्याने अनेक तरुण व्यसनाधीन बनल्याने गोरगरिबांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. परराज्यातून कामानिमित्त आलेल्या परप्रांतीयांच्या खिश्यात तर गुटख्याच्या माळाच दिसून येतात. परिणामी तरुण पिढी व्यसनाधीन होवून चुकीच्या मार्गाला जाताना दिसत आहे. परिणामी महाविद्यालयीन तरुणी, शाळेतील लहान मुलींचा पाठलाग करणे,छेड काढणे यासारखे प्रकार घडण्याची भीती निर्माण झाली आहे. कर्करोगासारखा गंभीर आजार तालुक्यात विळखा घालताना दिसत आहे. गुटखा व तंबाखू पर जिल्ह्यातून येते आणि तस्करांच्या माध्यमातून विक्रेत्यांकडे पोहोचते. अवैध पदार्थांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर पोलिसांचा धाक न उरल्याने कायद्याची पायमल्ली होत आहे.

अन्न व सुरक्षा मानदे कायदा २००६ नियम २०११-वितरण करणे गुन्हा आहे. आष्टी पोलीस ठाणे हद्द अंतर्गत सुरू असलेल्या अवैध धंद्यावर पोलीस कारवाई कधी करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# के.एस.के महाविद्यालयास केंद्र सरकार कडून स्वच्छ आणि हरीत विद्यालय हा उत्कृष्ट पुरस्कार प्राप्त

**बीड । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून २०२५-२६ यामध्ये देशभरात घेतल्या जाणार्या स्वच्छ आणि हरीत विद्यालय मुल्यांकनामध्ये बीड येथील सौ. के.एस.के महाविद्यालयास उत्कृष्ट दर्जा पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाविद्यालयास फोर स्टार मुल्यांकन मिळाले आहे.

सदर मुल्यांकन हे पाण्याचे राष्ट्रीय अभियान, स्वच्छता, पर्यावरणीय स्थिरता आणि जबाबदार नागरीकांचे पालन पोषण या अंतर्गत होते. यामध्ये महाविद्यालयाने फोर स्टार बहुमान मिळवून त्याबद्दलचे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ. भारतभूषण क्षीरसागर संस्थेच्या सहसचिव प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर, डॉ. भारतभूषण क्षीरसागर,



सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारीकाताई क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर संचालक डॉ. ए. एस. खान. कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर यांनी अभिनंदन केले आहे. या समितीचे प्रमुख प्रा. आसाराम खुटाळे व समितीतील सदस्य यांनी परीश्रम घेतले.

# माजलगाव नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदासाठी शेख हमीद वाहेद यांची उमेदवारी ; मोहनदादा जगताप यांच्याकडे निवेदन

### लोकसेवेच्या कार्याची दखल घ्यावी ; पक्षनेतृत्वाकडे शेख हमीद वाहेद यांची मागणी



**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) कडून माजलगाव नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदासाठी सामाजिक कार्यकर्ते शेख हमीद वाहेद यांनी आपली उमेदवारी जाहीर करत पक्षनेतृत्वाकडे अधिकृत निवेदन सादर केले आहे.माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मा. मोहनदादा जगताप यांना दिलेल्या निवेदनात शेख हमीद वाहेद यांनी गेल्या अनेक वर्षांपासून माजलगाव तालुक्यात सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असल्याचे नमूद केले आहे. समाजातील विविध घटकांसाठी उपक्रम राबवून लोकसेवेसाठी सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.येणाऱ्या माजलगाव नगरपरिषदेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार गट) वतीने स्वीकृत सदस्य म्हणून आपले नाव सुचवावे, अशी नम्र विनंती त्यांनी केली आहे. लोकसेवेचा अनुभव, सामाजिक कार्याची भक्कम पार्श्वभूमी आणि संघटनात्मक कामाची जाण लक्षात घेऊन पक्षाने आपला विचार करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या निवेदनाची प्रत तालुकाध्यक्ष विश्वंभर भाऊ थावरे, शहराध्यक्ष शकील कुरेशी, तसेच नगरपरिषद नवनिर्वाचित नगरअध्यक्ष बिलाल सहाल चाऊस यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. दरम्यान, शेख हमीद वाहेद हे लोकसेवा संकल्प सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष असून महाराष्ट्र बांधकाम मजूर कामगार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक चर्चा सुरू झाली आहे.

# संविधान हीच जीवन जगण्याची उत्तम पद्धती : उमेशकाका मोगरेकर

## संविधान वाचन पंधरवाडा महोत्सव-२०२५ संपन्न!

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका येथे लाऊड स्पीकर वरून भारतीय संविधान वाचन पंधरवाडा व कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमाचे उद्घाटन दिनांक १५ डिसेंबर रोजी मा.राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते संपन्न झाले.

दिनांक १६ डिसेंबर ते २८ डिसेंबर या कालावधीत विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन केले. यामध्ये ॲड. आरती गाडेकर, ॲड.सीमा उजगरे, बाळासाहेब सोनसळे ॲड.दत्ता जाधव, गोविंद गोचडे, सुरेखा गवळी, प्रा.डॉ.बालाजी बोडखे, नामदेव पाचपुते, नंदकुमार हवरगावकर, शेख इफ्तेखार, सखाराम जोशी, प्रा.संजय बागुल,दुर्गा राऊत व आसाराम ढगे या मान्यवर वाचकांनी सहभाग नोंदवून संविधानातील लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूलभूत मूल्यांचा आशय भारतीय संविधानावर आधारित मा.नूरखा पठाण लिखित आपले संविधान राज्य पद्धती नव्हे तर जीवन पद्धती या पुस्तकातील अनुच्छेद १ते ५१ चे वाचन उपस्थितांसमोर तसेच लाऊड स्पीकर द्वारे ऐकणाऱ्यांना प्रभावीपणे मांडला.या वाचन उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांमध्ये संविधानाविषयी जागृती निर्माण झाली.

या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित वाचन उपक्रमाची सांगता दिनांक २९ डिसेंबर रोजी संविधान मूल्यांवर आधारित कवि संमेलनाने करण्यात आली. कवि संमेलनात उद्घाटनपर मनोगतात ज्येष्ठ पत्रकार उमेशकाका मोगरेकर यांनी भारतीय संविधान संबंध विश्वात मौल्यवान असून,लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी त्याचे वाचन करणे अत्यंत आवश्यक असून तीच खऱ्या अर्थाने जीवन जगण्याची उत्तम पद्धती आहे असे सांगितले.या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात कवी प्रभाकर साळेगावकर हे होते. त्यांनी या उपक्रमामुळे संविधानाचे महत्त्व अधोरेखित होऊन नागरिकांमध्ये संविधानप्रती आदर, निष्ठा व जबाबदारीची भावना अधिक दृढ होईल असे



सांगितले.प्रमुख उपस्थितीमध्ये माजी न्यायाधीश मिलिंद डोंगरे यांनीही न्यायालयीन व्यवस्थेमधील अनेक उदाहरणांचा दाखला देऊन संविधानाचे महत्त्व प्रतिपादित केले.तर प्रमुख पाहुण्यांमध्ये श्रीमंत डोंगरे, लक्ष्मण मस्के, लक्ष्मण बनसोडे,कमलताई डोंगरे, प्रा.धम्मानंद बोराडे,आनंद सिरसट, अशोक कांबळे हे उपस्थित होते. या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन ना.मा. पडलवार सर यांनी केले.मोहन राठोड,बालाप्रसाद चव्हाण, भारत टाकणखार, पोशेट्टी लखमावार, वैभव सोळंके, सखाराम जोशी, प्रमोद काळे, मोहन राठोड, प्रवीण काळे,बालाप्रसाद चव्हाण, दीपक पांढरे, शरद रांजवन, गोविंद गोचडे, श्रीम.गौरी देशमुख, डॉ. प्रज्ञा जोशी, लता जोशी, स्मिता लिमगावकर, सारिका बेदरे, दुर्गा राऊत,संगीता जाधव, गौरी देशमुख, प्रतिभा थीगळे, जया मुंडे आदी कवींनी सहभाग घेत संविधानाची भावना व्यक्त करणाऱ्या आशयपूर्ण कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या उद्घाटनपर सत्राचे बहारदार संचालन बाबा जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक महासंघाचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार यांनी केले. आभार अभिमन्यू इबिते यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महासंघाचे पदाधिकारी राजकुमार सोनवणे, वसंत टाकणखार,निलेश गावडे, हनुमंत पांढरपोटे,नारायण भाळशंकर, शिवाजी भाळशंकर,अमोल राऊत, राहुल खुणे, प्रवीण जाधव राजेंद्र, सातपुते, सतीश डोणे, नितीन पुटवाड, किरण शिंदे, अजीमोद्दीन खतीब, अतुल चाळक, जमीर शेख, पठाण कासिम आदींनी परिश्रम घेतले.


## जाहिर प्रगटन

**उत्तराधिकार प्रमाणपत्र** (SUCSESSION CERTIFICATE)

**मा.श्री. व्ही. एस. यादव साहेब, ८वे सहदिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १९९६ / २०२५**

**राजेश महालिंगे व इतर वि. निरंक**

**(भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे )**

**अर्जदार - राजेश उर्फ राजाभाऊ पि. बाबुराव महालिंगे, वय ४६ वर्षे, धंदा मजुरी, रा. शुक्रवार पेठ, शनि मंदिराजवळ, काळा हनुमान ठाणा, बीड, ता.व जि. बीड. ह.मु.बी-१५२, सेक्टर-४, नवी मुंबई, ठाणे, ता. जि.ठाणे**

ज्याअर्थी मयत नामे **विमलबाई न. महादेव इगडे रा. शुक्रवार पेठ, बीड ता. जि.बीड हे दि. २२.०४.२०१३ रोजी मौजे शुक्रवार पेठ, बीड येथे मयत झाले आहेत.** यांचे उत्तराधिकार प्रमाणपत्र (SUCSESSION CERTIFICATE) मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयताचे नांवे खालील प्रमाणे जमा असलेली रक्कम उचलण्याकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

**अ.क्र., ठेव असलेल्या संस्थेचे नाव, बचत खाते / पॉलीसी कमांक, जमा रक्कम / ठेव-** १. स्टेट बँक ऑफ हैद्राबाद (सध्या स्टेट बँक ऑफ इंडिया), शाखा राजुरीवेस, बीड, खाते क्र. ५२०६७५९२९६८ (१,१५,८७७/- व व्याज)

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयत यांचे नांवे असलेली वर नमूद केलेली रक्कम अर्जदारांच्या नावे देण्यांत याव्यात असे अर्जदारांने म्हटले आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसाचे आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदार यांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे कायदेशीर वारस असल्याबद्यलचे उत्तराधिकार प्रमाणपत्र (SUCSESSION CERTIFICATE) दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील तारीख ०९.०२.२०२६**

आज दिनांक २४/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(मार्फत ॲड. बी.के.गायकवाड )**

**आदेशावरून**

**(स्वाक्षरीत)** **अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत)** **क. लिपीक**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ ● पान ४



श्री गजानन नागरी सहकारी बँकेने मयत पगारदार सभासद/नाम मात्र सभासदांना केशर ऋण रक्षा निधी योजना सुरू केली असून सदर योजनेद्वारे वसुलीस मदत होते व त्याद्वारे मयत काळे दीपक देविदास,वंजारे भीमराव बाबुराव व माने दत्तात्रय बाबुराव यांना केशर ऋण रक्षा निधीचे चेक बँकेचे चेअरमन तथा माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे हस्ते वाटप करण्यात आले आहे सदर कार्यक्रमाला बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे,संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी एम आर क्षीरसागर, सरव्यवस्थापक डॉ शेख एम एस,व्यवस्थापक विलास कुंबेफळकर व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# टोल नाक्यावर बांगर कुटुंबावर जीवघेणा हल्ला

## हल्ल्यात चार जखमी, हल्लेखोरांना अटक न केल्यास टोल नाका बंद करू



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील वैध किन्ही (ता. पाटोदा) येथील टोल नाका परिसरात रात्री दिनांक २९ डिसेंबर रोजी वादातून बांगर कुटुंबीयांवर बेदम मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात एका महिलेसह तीन पुरुष गंभीर जखमी झाले असून सर्व जखमींवर बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, टोल नाका परिसरात शेतात उभारण्यात आलेल्या हॉटेलच्या उद्घाटनावरून वाद झाला. तुझ्या शेतात हॉटेल का बांधले ? उद्या उद्घाटन कसे करतोस ते पाहतोच, अशा धमकीवजा भाषेतून वादाला सुरुवात झाली. त्यानंतर काही गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्ती बांगर कुटुंबावर अचानक हल्ला चढवत काठी, लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. या हल्ल्यात बांगर कुटुंबातील एका महिलेला तसेच तीन पुरुषांना गंभीर दुखापत झाली आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून समाजबांधवांनी संताप व्ये केला आहे. हल्लेखोरांवर तात्काळ कठोर कारवाई न झाल्यास टोल नाका बंद करण्याचा इशारा समाजबांधवांनी दिला आहे. दरम्यान, घटनेची माहिती ▶▶ उर्वरित पान २ वर



● बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या व्यासपीठावरून काही नेते एका विशिष्ट जातीविरोधात प्रक्षोभक वे व्ये करत आहेत. अशा वे व्यांचा गैरफायदा काही कार्यकर्ते घेत असून, त्यातून मोठे वाद व तणाव निर्माण होत आहेत. बीड जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था नांदवायची असेल, तर पोलीस प्रशासनाने विशिष्ट जातीविरोधात प्रक्षोभक भाषणे करणाऱ्या नेत्यांवर स्वत...हून (सुओ मोटो) गुन्हे दाखल करणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून भविष्यात असे प्रकार वाढणार नाहीत.वैद्यकिन्ही टोलनाक्यावर करण्यात आलेल्या अमानुष मारहाणीचा आम्ही तीव्र शब्दांत जाहीर निषेध करीत आहोत. तसेच या प्रकरणातील संबंधित आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी ठाम मागणी वंचित बहुजन आघाडी, बीड जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत आहे. – अजय सरवदे , जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (पश्चिम)

## अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील आदर्श कार्याचा गौरव

### ह.भ.प.राजू महाराज लोखंडे यांना 'गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५' जाहीर



**आष्टी । प्रतिनिधी**

समाजातील अध्यात्मिक, धार्मिक व तर्कशास्त्रीय क्षेत्रात आगळेवेगळे व समाजोपयोगी कार्य करणारे ह.भ.प. राजू महाराज लोखंडे (श्री राजेंद्र गंगाराम लोखंडे) यांची गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. गंगाई-बाबाजी पुरस्कार संयोजन समितीच्या वतीने हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून त्यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण दिघोळ (ता.जामखेड) येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. शालेय जीवनापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड नगर पालिकेच्या गटनेते पदी फारुक पटेल

## अजितदादांच्या नेतृत्वात शब्द पूर्ण करणारे प्रतिनिधी देऊ: आ. विजयसिंह पंडित



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिकेत ऐतिहासिक विजय मिळविल्यानंतर राष्ट्रवादी पक्षाच्या नेतृत्वात शिव-शाहू-फुले आघाडीची स्थापना झाली असून राष्ट्रवादी सह बीड शहरातील समविचारी विजयी नगरसेवकांची ऐकी झाली असून नगर परिषदेत आघाडीकडून गटनेते म्हणून ज्येष्ठ नगरसेवक फारुक पटेल यांची निवड करण्यात आली. प्रचाराच्या दरम्यान मतदारांना आम्ही पक्ष म्हणून विजयानंतर विकासाचे शब्द दिले, नागरी समस्यांचे निराकरण करू असा शब्द आम्ही प्रभागनिहाय बैठका, सभांतून दिला होता. आज बीडकरांनी अजितदादांवर विश्वास ठेऊन पुरोगामी मतांची वज्रमुठ सिध्द केली आहे. दिलेले शब्द आणि आश्वासने पाळणारी आणि सामाजिक ▶ उर्वरित पान २ वर

### ● शिव-शाहू-फुले-आंबेडकर आघाडी नाही बांधिलकी

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिव-शाहू-फुले-आंबेडकर हा विचार घेऊनच पक्ष संघटन आणि निवडणुकांच्या प्रक्रियात काम करत आला आहे. बीड शहरात विजयी उमेदवारांची आघाडी स्थापन करताना देखील आ. विजयसिंह पंडित यांनी आघाडीचे नामांकरण शिव-शाहू-फुले-आंबेडकर असे सुचवले. यावर प्रतिक्रिया देताना हे केवळ आघाडीचे नाव नसून आमच्या पक्षाची सामाजिक आणि राजकीय बांधिलकी असल्याचे आ. पंडित यांनी म्हटले.**

# बुलढाणा अर्बन बँक बंद पडणार ? अफवेने वडवणीत खळबळ

## खातेदारांची पैसे व गोल्ड लोन काढण्यासाठी तुफान गर्दी



**वडवणी । प्रतिनिधी**

बुलढाणा अर्बन बँक बंद पडणार आहे अशी अफवा अचानक वडवणी शहर व परिसरात पसरल्याने सोमवारी एकच खळबळ उडाली. या अफवेच्या पार्श्वभूमीवर सकाळपासूनच बँकेच्या वडवणी शाखेसमोर खातेदारांची मोठी गर्दी उसळली होती. अनेक खातेदारांनी आपली ठेव रक्कम काढण्यासाठी तसेच गोल्ड लोनवरील दागिने परत घेण्यासाठी धाव घेतल्याचे चित्र पाहायला मिळाले. अफवा पसरताच बँकेसमोर रांगा लागल्या. काही नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. बँक बंद पडली तर आपले पैसे अडकतील या भीतीने अनेक खातेदारांनी तातडीने व्यवहार करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही काळ बँकेच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● जिल्ह्यात १२ शाखा सुरळीत अफवेवर विश्वास ठेऊ नका : काटे

**शाखा व्यवस्थापक काटे यांनी खातेदारांना अफवेवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, बँकेचे व्यवहार पूर्णपणे सुरक्षित असल्याचे सांगितले आहे. बीड जिल्ह्यात बुलढाणा अर्बनच्या एकूण १३ शाखा आहेत. उर्वरित १२ शाखांमध्ये कामकाज सुरळीत सुरू असताना केवळ वडवणीतच ही अफवा पसरल्याने आश्चर्य व्यक्त वाटत आहे.**



*श्री.क्षेत्र नारायणगड येथे गडाचे महंत ह.भ.प.प्रेममुर्ती श्री.शिवाजी महाराज,माता नर्मदा परिक्रमा पूर्ण करून आले असताना बाबा चे मनःपूर्वक स्वागत केले व शुभ आशीर्वाद घेतले.यावेळी गडाचे उत्तराधिकारी हभपमहंतश्रीसंभाजी महाराज यांचे स्वागत करून शुभ आशीर्वाद घेतले. बाबांच्या आगमनाने गड आनंदाने फुलून गेला होता.हा दैदीप्यमान सोहळा पाहण्याचे भाग्य लाभले.गडावर आगमन सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भाविक भक्त आनंदाने सहभागी झाले होते.*

## ३०५ एकर क्षेत्रात फळबाग लागवड कार्यक्रम हर्बालाईफ व फार्मसी फॉर फॉरेस्टचा पुढाकार कार्यक्रमासाठी १०५ कोटीचा निधी देणार

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढविण्याच्या उपक्रमांना शासन प्रोत्साहन देत आहे. शासनाच्या शाश्वत व दीर्घकालीन उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा यासाठी हर्बालाईफ कंपनीने सामाजिक बांधिलकी उपक्रम अंतर्गत पुढाकार घेतला असून याला फार्मर्स फॉर फॉरेस्ट या संस्थेने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या अंतर्गत जिल्हयात पडीक जमीन विकास तसेच वृक्ष लागवड आणि संवर्धन यासाठी ३०५ एकर वर फळबाग व देशी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यासाठी १.५ कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे.



*राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत कडधान्य २०२५-२६ हरभरा पीक शेतकरी प्रशिक्षण सावंतवाडी येथे घेण्यात आले यावेळी श्री अंबुरे साहेब मंडळ कृषी अधिकारी नेकनूर,श्री के बी शिंदे साहेब स.कृ. अ. नेकनूर ,सुनील बहिरवाल स.कृ. अ सावंतवाडी ,सरपंच, सदस्य, व शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. श्री पवार बापू यांनी हरभरा पिकाविषयी मार्गदर्शन केले.*

## श्री महाविष्णु मंदिर, शु.ति.लिबगाव ता. माजलगाव या राज्यसंरक्षित स्मारकाची अधिसूचना जारी : आ. प्रकाशदादा सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील शुक्लतिर्थ लिबगाव येथील श्री महाविष्णु मंदिर हे इ.स. १२ शतकातील कल्याणी चालुक्य कालीन मंदिर आहे. या मंदिराची रचना मुखमंडप, सभामंडप, अंतराळ व गर्भगृह अशी आहे. मंदिरातील रंगशीळेचे आठही स्तंभ अलंकृत आहेत. या मंदिरास पुरातत्व विभागाच्या वतीने राज्यसंरक्षित स्मारक म्हणुन घोषित ▶▶ उर्वरित पान २ वर

**यापुर्वी तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथील पुरूषोत्तम मंदिराच्या जतन व संवर्धन कामासाठी २७ कोटी रू.चा निधी मंजुर करण्यात आला असुन कामे प्रगतीपथावर आहे. तसेच केसापुरी येथील केशवराज मंदिराच्या जतन व संवर्धन कामासाठी देखील १० कोटी रू.चा निधी मंजुर केला असून काम प्रगतीपथावर आहे.**

# सावित्रीबाई फुले यांनी प्रत्येक स्त्रीच्या मनात क्रांतीची मशाल पेटविली : डॉ. नागेश गवळी

**बीड । प्रतिनिधी**



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती (महिला), बीड यांच्या वतीने आयोजित सावित्री उत्सव २०२५-२६ अंतर्गत दिनांक २८/१२/२०२५ रोजी डॉ. नागेश गवळी यांचे प्रेरणादायी प्रबोधनात्मक व्याख्यान उत्साहात पार पडले. यावेळी बोलताना डॉ. नागेश गवळी यांनी सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, देशात सामाजिक परिवर्तनाची पहिली ठोस आणि व्यापक चळवळ फुले दांपत्यांनी उभी केली. समाज शिक्षणाच्या प्रवाहात येत नाही, तोपर्यंत परिवर्तन शक्य नाही, ही भूमिका ठामपणे मांडत सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची ऐतिहासिक ▶ उर्वरित पान २ वर

## शिवसेनेच्या संजय उडाण यांची उपनगराध्यक्षपदी नियुक्ती करा: अनभुले, सुरवसे

**बीड । प्रतिनिधी**



नुकत्याच पार पडलेल्या बीड नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसंग्राम युतीला मतदारांनी भरघोस कौल दिला आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला असून, युतीचे तब्बल २२ नगरसेवकही विजयी झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर सलग दोन टर्मपासून नगरसेवक म्हणून कार्यरत असलेले शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक संजय उडाण यांची उपनगराध्यक्ष पदी निवड करावी, अशी जोरदार मागणी शहरभरातून होत आहे. नगरपालिकेतील दीर्घ अनुभव, ▶▶ उर्वरित पान २ वर

# रणवीर पंडित यांनी विद्यार्थी खेळाडूंना मोबाईल कडून मैदानावर आणले: गणेश सावंत

## गेवराईचे खेळाडू देशपातळीवर नावलौकिक मिळवतील: जालिंदर धांडे

## क्रिडा महोत्सवात मालेगाव येथे व्हॉलीबॉल स्पर्धेचे शानदार उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**



शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रामध्ये चांगले वातावरण तयार झाले आहे, सध्याची युवापिढी मोबाईलच्या रिल्स मध्ये अडकली असताना रणवीर पंडित यांनी शालेय विद्यार्थ्यांना मैदानावर आणून मोठे काम केले आहे असे गौरवोद्गार पत्रकार गणेश सावंत यांनी केले तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रणवीर पंडित यांनी या क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे, गेवराई सारखीच ही चळवळ आपण बीड जिल्ह्यात सुरु करावी, शिवछत्र परिवाराने सामाजिक क्षेत्रा बरोबरच क्रीडा क्षेत्रातील काम पाहता एक दिवस हे खेळू देशपातळीवर नावलौकिक मिळवतील असा विश्वास संपादनक जालिंदर धांडे यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत शारदा क्रीडा महोत्सवात मालेगाव येथील शिवाजी विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन ▶ उर्वरित पान २ वर

### ● क्रीडा महोत्सवात नाविण्य आणण्याआचा आमचा प्रयत्न: रणवीर पंडित

**क्रीडा महोत्सवाचे है चौथे वर्ष असून विद्यार्थी खेळाडूंचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. क्रीडा महोत्सवात नाविण्य आणण्याआचा आमचा प्रयत्न असून या वर्षी जलतरण स्पर्धेचा समावेश करण्यात आला आहे. विविध स्पर्धांमध्ये खेळाडूंने उत्तम खेळाचे प्रदर्शन करणे हे आपल्यासाठी समाधानाची गोष्ट आहे असेही ते यावेळी म्हणाले.**